# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर

नागाळा पार्क, कोल्हापूर

फोन नं- (०२३१) २६५२३२७, २६६१६५३

Email ID:dhokop1@gmail.com


जा.क्र.कोजिप/आरोग्य/कक्ष-१/कावि-४/११५१/२०२४

दिनांक :- /०२/२०२४

वाचले :-

१) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियम)नियम १९८२

२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील क्र.अराप/११६९/१२२/सीआर/३१/१५, दिनांक १७ जुलै ८९

३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४ /२०१२, दि.२१/१०/२०११

४) मा. मु. का. अ., जि. प. कोल्हापूर यांचेकडील प्रदान अधिकार प्रदान आदेश क्र.कोजिप/साप्रवि /कावि-१/१८६८/२०११, दिनांक १६/०९/२०११ मधील क्रमांक ८१

५) कार्यालयाची मंजूर टिपणी दिनांक :- /०२/२०२४

## आदेश

संदर्भ क्र. ३ चे शासन निर्णयात नमूद केलेप्रमाणे परिशिष्ट ब नुसार दिनांक ०१/०१/२०२३ इ.रोजीची **आरोग्य सेवक (म)** संवर्गातील अंतिम जेष्ठता यादी यापूर्वी प्रसिध्द करणेत आलेली आहे.

संदर्भ क्र ३ ने सुचित केले नुसार आता परिशिष्ट उदाहरण क्र. ६ नुसार दि. ३१/१२/२०२२ रोजीचे कार्यरत कर्मचारी व दि ०१/०१/२०२३ ते ३१/१२/२०२३ या कालावधीत नव्याने नियमित नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांची एकत्रित जेष्ठतासूची प्रसिध्द करणे बाबत सुचित केले आहे.

त्यास अनुसरुन जिल्हा परिषद, कोल्हापूरकडील जिल्हा सेवा वर्ग-३ **आरोग्य सेवक (म)** या पदावरील दिनांक **०१/०१/२०२४ ची सर्व समावेशक तात्पुरती जेष्ठता यादी** सोबत दर्शविलेप्रमाणे याद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे.

सदरची यादी सर्व संबंधितांचे निदर्शनास आणावी व त्याबाबत कांही हरकती / दुरुस्ती असल्यास त्या संबंधित कार्यालय प्रमुखांचे मार्फत **दि.२९/०२/२०२४** अखेर या कार्यालयाकडे सादर कराव्यात. हरकती/ दुरुस्ती या वेळेवर प्राप्त न झालेस त्याबाबत नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. याची सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना पूर्व सूचना देणेत यावी. खाली दिलेल्या दाखल्याच्या नमून्यात तक्रार नसल्याचा दाखला देणेत यावा. जेष्ठता यादी निदर्शनास न आणलेबाबतची तक्रार आलेस याबाबत संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.

तसेच सदरची तात्पुरती अतिरिक्त जेष्ठता सूची ही जिल्हा परिषदेचे **zpkolhapur.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करणेत आलेली आहे.

(डॉ.राजेश गायकवाड)
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**

प्रति,

१) गट विकास अधिकारी, पंचायत समिती. ------------------------- (सर्व)

२) वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र ---------------------------------(सर्व)

३) तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती ----------------------(सर्व)

**दाखला -** दाखला देणेत येतो की ..................या संवर्गाकडील दिनांक **०१/०१/२०२४** ची **सर्व समावेशक तात्पुरती जेष्ठता सूची** सर्व विभागाकडील / तालुक्यातील सर्व सूची मधील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणली असून कोणत्याही कर्मचाऱ्याची कोणत्याही स्वरुपाची तक्रार नाही. / ज्यांची तक्रार आहे अशा कर्मचाऱ्यांची लेखी हरकत सोबत सादर केली आहे.

(डॉ.राजेश गायकवाड)
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**